सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
B Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ सोलापूर
## परीक्षा विभाग

परिपत्रक क्रं. २६ /२०१७

**(अत्यंत महत्वाचे)**

सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य/ संचालक व विभागप्रमुख तसेच , प्राश्निक अध्यक्ष व सदस्य यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, पेपर सेटिंगकरीता SMS COE SUS या Sender ID वरुन पाठविले जातात. सदर SMS व्दारे कळविलेल्या तारखांनुसार पेपर सेटींग करुन देणे आवश्यक आहे. तथापि प्रशासनाच्या असे निदर्शनास आले आहे की काही प्राश्निक SMS व्दारे कळविलेल्या वेळेप्रमाणे पेपर सेटींगचे काम करत नाहीत. त्यामुळे पेपर सेटींगचे काम पर्यायाने परीक्षेची कामे वेळेत पूर्ण होत नाहीत. त्यामुळे परीक्षा काळात अडचणी निर्माण होतात.

सबब, प्राश्निक अध्यक्ष व सदस्य यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील होणाऱ्या परीक्षांचे पेपर सेटिंग विभागाकडून SMS द्वारे कळविण्यात आलेल्या तारखेसच पेपर सेटिंग करून देणे बंधनकारक राहील,परंतू काही अपरिहार्य कामामुळे दिलेल्या तारखेस पेपर सेटींग करणे शक्य न झाल्यास देण्यात आलेल्या तारखेपासून जास्तीत जास्त पाच दिवसाच्या आत पेपर सेटिंग करुन प्रश्नसंच जमा करणे अनिवार्य असेल.

वर नमुद केल्याप्रमाणे विहीत वेळेत प्रश्नसंच जमा न केल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४८ (४) नुसार संबधितावर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक यांना सूचित करण्यात येते की, पेपर सेटींगचे SMS मिळालेल्या प्राश्निकांना पेपर सेटिंग करीता कर्तव्य रजेवर त्वरीत पाठवावे.**

**तसेच पेपर सेटिंग करीता विद्यापीठात येताना सोबत जोडलेल्या प्रपत्रात आपल्या बँक खात्याचा तपशील सोबत आणुन बीलसोबत जोडने अनिवार्य आहे.**

उक्त बाब आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे जेणेकरून परीक्षेचे कामकाज सुरळीतपणे व वेळेत पार पाडता येईल.

(बी.पी.पाटील)
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**संदर्भ क्रं.: सोविसो/परीक्षा/पेपर सेटिंग/२०१७-१८/१६६५**

**दिनांक :- १८/०७/२०१७**

**प्रत- कार्यवाहीस्तव :**

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
२. मा.संचालक/विभागप्रमुख,सर्व शैक्षणिक संकुले,प्रस्तुत विद्यापीठ.